जिल्हा परिषद जळगांव
सामान्य प्रशासन विभाग, नोंदणी शाखा
12 MAR 2003

जिल्हा ग्राम विकास निधीच्या गुंतवणूकीबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन परिपत्रक क्र. - व्हीपीएम-२६०३/प्र.क्र.१९४०/पंरा-४(२२)
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. दिनांक २८ फेब्रुवारी, २००३

**शासन परिपत्रक :-**

मुंबई जिल्हा ग्राम विकास निधी नियम १९६० चे कलम ५ अन्वये जिल्हा ग्राम विकास निधीमधील रक्कमा गुंतविणे व पुन्हा गुंतविणेबाबत स्पष्ट तरतूद आहे. असे असतांनाही सदर निधी योग्य प्रकारे न गुंतविल्यामुळे व्याजाची हानी झालेली आहे. अशा आक्षेपाचे काही परिच्छेद अनेक जिल्हा परिषदेकडून शासनाला प्राप्त झालेले आहेत. याबाबत शासनाने वेळोवेळी परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक-व्हीपीएम -२६९९/ प्र.क्र.१०७१/२२,दिनांक १८-११-९९, क्र.-व्हीपीएम-२६९९/ प्र.क्र.१०७१/२२, दि.२२-११-२००३, क्र.-व्हीपीएम-२६००/ प्र.क्र.१६४३/ २२,दिनांक८-१-२००२, क्र.-व्हीपीएम-२६००प्र.क्र.१६४३/२२, दिनांक १६-५-२००२ अन्वये सदर निधी कशा प्रकारे गुंतवावा याबाबत मार्गदर्शनपर सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्याकडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यांत येत आहे. त्यानुसार सदर निधी योग्य प्रकारे गुंतविणे अपेक्षित आहे. याबाबत काही अडचण आल्यास अथवा शंका असल्यास सदर निधी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचेकडे अधिनस्त असल्यामुळे त्यांनी त्याबाबत आवश्यकतेप्रमाणे जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे मार्गदर्शन घ्यावे असे निदेश देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(कुंदा गोसावी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
वरिष्ठ लेखा अधिकारी,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
निवड नस्ती का. क्र.-परा-४ (२२)ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२-

ग्रामपंचायत विभाग
जिल्हा परिषद, जळगांव.
संदर्भ मिळाल्याचा दि. 17 MAR 2003
टेबल नं.
नोंदणी क्र.

RR No-100
19/3/03

Scanned with OKEN Scanner